
म. ग्रं. सं. वाचनालय ठाणें
विषय बा.वा.
दा. क. ३६६०



IRBK-0103661
IRBK-0103661

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.




# नीलकमलें

लेखक
गोविंद मुळगांवकर

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य सहा आणे

प्रथमावृत्ति : १९४५

पुनर्मुद्रण : १९५१

★

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

★

मुद्रक

बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय

चिराबाजार, मुंबई २

★

प्रकाशक

केशव भिकाजी ढवळे,

श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४

★

चित्रकार

रघुवीर मुळगांवकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ३६६७ नों. दि ................
वि. ...आ. बा.... क्र. ................

आई,

ही पहिली ओंजळ तुझ्या चरणीं
सादर करीत आहें.

—बापू

IRBK-0103661
IRBK-0103661

बालमित्रांनो —

हीं नीलकमळें म्हणजे सहा गोष्टी आहेत, म्हणजेच सहा कमळें आहेत. कमळांत काय असतें? मध ना? चटकन दिसत नाहीं तो. कष्टानें शोधून चाखावा लागतो. तसाच ह्या गोष्टींतला मध तुम्ही चाखा, म्हणजेच ह्या गोष्टी शांत चित्तानें, समजून वाचा. नुसत्या डोळ्यांनीं नव्हे, तोंडानें नव्हे, तर अंत:करणानें वाचा. मग चाखालच तुम्ही त्यांतला मध.

—गो. शं. मुळगांवकर

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ चिमा | ... | ... | ६ |
| २ तिची बाळें | ... | ... | १५ |
| ३ लाला आणि शिडी | ... | ... | १९ |
| ४ जिवाचा आत्मा | ... | ... | २३ |
| ५ कुंदाची भाऊबीज | ... | ... | ३० |
| ६ काळा फत्तर ! | ... | ... | ३५ |


चिमा
Mulgaokar

"आई कुणा म्हणूं मी; आई घरीं न दारीं
स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी ..."

मैत्रिणीच्या घराकडून मी नुकतीच परतलें होतें. रात्रीचे आठ वाजून गेले असतील त्या वेळीं. माझ्या खोलीच्या दारांत पाऊल टाकतांच, वरील चरण अगदीं खालच्या आवाजांत, कंपित स्वरानें, कोणीतरी गुणगुणत असलेलें ऐकूं आलें. मीं हळूच आंत डोकावून पाहिलें; शेजारची 'चिमा' माझ्या अभ्यासाच्या टेबलाजवळ बसून गात होती. दाराजवळ तिची पाठ असल्यामुळें हळूच तिच्या पाठीमागें जाऊन मला उभी राहातां आलें. त्याच वेळीं ती आपल्या डोळ्यांत दाटलेले अश्रु पुशीत होती. मांडीवर यशवंत कवींचें 'यशोधन' पुस्तक उघडें होतें, नि 'आई' कविता उघड्या असलेल्या पानावर दिसत होती. त्याच कवितेवर चिमाचे डोळे स्थिरावले होते. पापण्या हलत नव्हत्या. जवळच्या खिडकींतून आलेल्या वाऱ्याच्या मंद झुळकेनें पुस्तकाचीं दोनचार पानें भरकन् उलटून गेलीं. तरीही चिमा त्याच जागेवर पाहात होती. काय पाहात असेल ती? आपल्या मृत आईची प्रेमळ मूर्ति डोळ्यांपुढें दिसत असेल का तिला? हो, आपल्या आईच्याच मूर्तींत एकरूप झाली असावी ती.

सावत्र आईच्या मायेला (?) त्रासलेल्या बिचारीच्या जिवाला एवढाच विरंगुळा; पण तोही लाभायचा तिच्या नशिबांत नव्हतें.

'........ चांडाळणी, इथें बसलीस काय चकाट्या मारीत? जेवायचा वेळ झाला तरी घरांत यायला नको? पानं मांडायला

कोण तुझी आई येईल वरून?...... तिची सावत्र आई—राधाकाकू—कैदाशिणीसारखी कडाडत आंत शिरली. ते शब्द तापलेल्या सळईसारखे कानांत शिरतांच, चिमा ताडकन् उठून उभी राहिली आणि भ्यालेल्या हरिणीसारखी चटकन् निघून गेली. पुढील शिक्षेची जाणीव तिच्या बालमनाला भेडसावल्याशिवाय कशी राहील? जातांना माझ्याकडे एकवार पाहून तिनें मंदस्मित केलें. मूर्तिमंत कारुण्य तिच्या नजरेंत दिसलें मला.

आमच्या घरासमोरच बळवंतरावांचें बिऱ्हाड होतें. घरांत माणसें म्हणजे ते, त्यांची दुसरी बायको राधाकाकू, पहिल्या बायकोची चिमा आणि राधाकाकूंची मालू इतकींच काय तीं. ते एक बडे सरकारी ऑफिसर होते. त्यांचा सारा वेळ ऑफिसांत जायचा. त्यांचा स्वभाव फार चांगला होता. मनमिळाऊपणानें वागायचे आणि कधींच कोणाला दुखवायचे नाहींत. पण त्यांच्या उलट, अगदीं उलट राधाकाकूंचा स्वभाव होता. आपण म्हणजे कोणी मोठ्या, आपणाला साऱ्यांनीं मान द्यावा, असेंच त्यांना वाटे आणि जर कोणी त्यांचा हा वरचढपणा पसंत केला नाहीं तर त्याच्यावर सारा दिवस राधाकाकू तोंडसुख घेत. अशा तऱ्हेनें आळींतील साऱ्या बायकांशीं त्यांचें बिनसलें होतें. कोणीच त्यांच्या तोंडाला लागत नसे. त्यांच्या ह्या तुटक स्वभावाला बळवंतराव अगदीं कंटाळून गेले होते. पण करणार काय बिचारे! ऑफिस सुटल्यावर मित्रमंडळीबरोबर फिरत आणि रात्रीं घरीं येत.

त्यांची प..  बायको म्हणे फार चांगल्या स्वभावाची होती. चिमाही आईसारखी उतरली ह्यांत नवल कसलें? ती वारली त्या वेळीं चिमा होती आठ वर्षांची. तिला आपल्या आईची आठवण झाल्याशिवाय कशी राहील? बिचारीच्या नशिबांत सुख नव्हतें, म्हणूनच तिची सावत्र आई इतकी वाईट निघाली. भांडीं घासतांना, धुणी धुतांना, किंवा लांबच्या विहिरीवरून घराकडे पाणी नेतांना, फाटकें पातळ नेसलेल्या चिमाला जर कोणी पाहिलें असतें तर तिचे वडील एक बडे सरकारी अधिकारी आहेत, हें सांगून देखील खरें वाटलें नसतें त्यांना.

बळवंतरावांच्याही दृष्टीला ह्या गोष्टी कधीं कधीं पडत, त्यांना गहिंवर येई, वाईट वाटे, पण करणार काय? मोलकरीण ठेवण्याचा विचार बायकोजवळ बोलून दाखविण्याचा अवकाश, कीं 'कांगावखोर कारटी, आतां कांहीं लहान नाहीं बसून गिळायला. सारा दिवसभर मर मर मरतें मी आणि नांव कुणाचें तर ह्या कारटीचें. कांहीं नको मोलकरीण ठेवायला. कारटीला लाडावून ठेवायची असेल तर खुशाल ठेवा .........' वगैरे वाग्बाण त्यांना ऐकावे लागत. मोलकरीण ठेवलीच तर ती किती दिवस टिकेल हें काय सांगायला पाहिजे होतें?

ते बाहेर जातांच, दोन्हीं हातांनीं चिमाच्या झिंज्या पिळवटून 'चांडाळणी, माझ्या विरुद्ध त्यांच्याजवळ कांगावा करतेस होय? आईच्या मागें कां नाहीं गेलीस मरून? कां राह्यलीस मला

छळायला ?' अशी हिणवून, तिचें डोकें स्वैंपाकघराच्या भिंतीवर ताडताड आपटण्यास त्या कमी करीत नसत. पण चिमा — तिनें माईला कधीं उलट जबाब दिला नाहीं, माई सांगेल त्याच्या बाहेर ती कधीं वागली नाहीं, किंवा माईच्या मुलीवर — मालूवर असलेली तिची माया कधीं कमी झाली नाहीं. तिची शाळा जर सुटली नसती, तर ती आज माझ्याबरोबर शिकली असती. पण तिसरी इयत्ता झाल्यावर तिला घरचीं कामें करण्यासाठीं घरीं बसावें लागलें. तरी पण सारीं कामें आटोपल्यावर रात्रीची ती माझ्याकडे येई, माझीं पुस्तकें वाचून पाही; मीही तिला मोठ्या आनंदानें शिकवीत असे.

सावत्र आई इतकी छळीत असूनही, तिनें कधींच एका शब्दानें तिच्याविरुद्ध मला किंवा आईला सांगितलें नाहीं. कधीं आईनें विचारलेंच तर ती म्हणे, 'नाहीं ग, इतकी वाईट नाहीं ग आमची माई.' एवढ्या लहान वयांत, न शिकतां चिमाला इतकें शहाणपण आलें कोठून ? आश्चर्य वाटे मला. भयंकर त्रास भोगत असूनही तिच्या तोंडावर खिन्नतेची रेषा मला कधीं दिसली नाहीं.

त्या दिवशीं अशीच ती आमच्या घरीं आली होती. दिव्याच्या उजेडांत, तिच्या उजव्या गालावर एक काळा चौकोनी डाग मला दिसला. 'कसला ग तो डाग, चिमा ?' असें मीं विचारतांच 'कुठें काय ग, लागलं असेल कांहीं तरी' असें म्हणून तो पुसण्याचा तिनें आविर्भाव केला. पण असें करतांना तिच्या डोळ्यांत अश्रु दाटलेले मला आणि आईला स्पष्ट दिसले.

अनुक्रम २८८
विभाग प्रा न
९५५
५-७

'बाळ, पुसून जायचा नाहीं तो डाग. कातडी भाजली आहे तिथली. खरं सांग बाळ, काय झालं?' आईचे हे प्रेमळ शब्द ऐकतांच, कधींच न रडणारी चिमा, आईच्या गळ्याला मिठी मारून हुंदके देऊन रडूं लागली.

'वहिनी, आईची आठवण झाली ग मला आज. तिच्या मागें असे मायेचे शब्द मला ऐकूं आले नव्हते ग......... तूं नि सुलूच फक्त माया करतां ग माझ्यावर' असें बोलून ती आणखी हुंदके देऊं लागली. शेवटीं तिनें सारी गोष्ट सांगितली. आईची आठवण झाल्यामुळें, स्वैंपाकघरांत काम करतांना तिच्या डोळ्यांत म्हणे अश्रु आले आणि ते राधाकाकूंच्या नजरेला पडतांच, आपल्या भरल्या घरांत रडल्याबद्दल तिनें उलथणें तापवून म्हणे चिमाच्या गालावर......... मानवी हृदय नव्हे, राक्षसी हृदय तें! 'चिमाचे अर्धे हाल तूं भोगशील का?' असें म्हणून जर कोणी मला विचारलें असतें तर मी म्हणालें असतें 'अर्धेच कशाला, चिमा सुखी होत असेल, तर तिचे सारेच हाल भोगायला मी तयार आहें.' खरोखर चिमा मला फार आवडत होती.

* * *

शाळेंतून घरीं आलें त्या वेळीं पांच वाजून गेले होते. आई घरांत नव्हती. मोलकरणीला विचारतांच, 'राधाकाकूंच्या मालूचें जास्ती झालें ःई, आईही तिथेंच गेली आहे' असें कळलें.

'धस्' झालें एकदम माझ्या काळजांत. आज दहा बारा दिवस मालू आजारी होती. पुष्कळ डॉक्टरांचीं औषधें चालू आहेत, हें मला माहीत होतें. दर दिवशीं चिमाकडून मला खबर कळत असेच. आणि आज ... चहा तशीच टाकून मी राधाकाकूंच्या घरीं गेलें. मालूला निजविलेली खोली, देवघराच्या दुसऱ्या बाजूला होती. देवघरांत चिमा देवापुढें हात जोडून उभी असलेली दिसली मला. मालूला निजविलेल्या खोलीच्या दारांत बायकांची गर्दी जमली होती. मालू झोपली होती. तिच्या कपाळावर बर्फाची पिशवी धरून राधाकाकू बसल्या होत्या. एकसारखा अश्रुप्रवाह चालला होता त्यांच्या डोळ्यांतून. कन्सल्टिंगला आणलेले गांवांतील मोठे डॉक्टर विचार करीत बसले होते आणि बळवंतराव हताश मुद्रेनें कपाळाला हात लावून खिडकींत उभे होते. खोलीला गंभीर स्वरूप आलें होतें.

... 'कसं करायचं ? रक्त तर घातलंच पाहजे, त्याशिवाय मुलगी कशी हाताला लागणार ?' डॉक्टरांची आपसांत चाललेली कुजबुज मला ऐकूं आली. दूषित रक्त काढून टाकल्यामुळें आलेली अशक्तता, नवीन रक्त न घालतां जास्त वेळ ठेवली तर मुलगी हाताला येणार नाहीं हें मला समजून चुकलें.

मालू वांचणार नाहीं ? रक्त न घातलं तर राधाकाकूंची मालू खरंच का वांचणार नाहीं ? चिमाचा छळ केल्याबद्दलचं शासन देव तिला देतो आहे का ? नको, देवा, इतकं भयंकर शासन देऊं नकोस रे तिला. माझे हात आपोआपच जोडले गेले.

"बाळ, वेलीवरलं फूल फुलदाणींत कधीं टिकतं का रे? तें कोमेजून जायचंच. वेलीवांचून फूल नि आईवांचून मूल कधीं राहूं शकणार नाहीं बरं!"

पण आईचे हे शब्द अरूला कोठले पटायला. थोड्याच वेळानें त्या कापसाच्या शेजेवर ते जीव मरून जात. पण अरूनें आपला नाद कधीं सोडला नाहीं.

नुकतीच पावसाची एक लहानशी सर येऊन गेली होती. झाडांच्या पानांवरून पाण्याचे टपोरे थेंब खालीं टप्‌टप् उड्या घेत होते. उन्हाचे सोनेरी किरण, रस्त्यांत मधून मधून सांचलेल्या पाण्यांत चकाकत होते.

अरू गोफण घेऊन रानांत गेला. बराच वेळ तो येथून तेथें फिरला. पण कोठेंच घरटें सापडलें नाहीं त्याला.

एका मोठ्या झाडाखालीं उभा राहून तो न्याहाळूं लागला. झाडावरून पाण्याचे थेंब मधून मधून त्याच्या डोक्यावर पडूं लागले.

इतक्यांत एक कोकिळा कोठून तरी भुर्रकन् आली आणि झाडांच्या फांद्यांत अदृश्य झाली. अरूनें बारकाईनें पाहिलें. एक घरटें! त्याला फार आनंद झाला. दगड लावून त्यानें गोफण ओढली. ती कोकिळा भयभीत होऊन ओरडूं लागली.

पण, दगड सुटला आणि घरटें भर्रदिशीं खालीं आलें. अरूनें धावत जाऊन तें उचललें. त्यांत लहान लहान तीन पिलें होतीं. पण जोरानें आपटल्यामुळें तीं तीनही मेलीं होतीं. अरूला फार वाईट वाटलें. त्यानें पुन्हा वर पाहिलें आणि ...

केवढ्यानें दचकला तो! अगदीं जवळच्या फांदीवर ती कोकिळा बसली होती. आपल्या मृत पिलांकडे ती टक लावून पाहात होती. टप् टप् दोन थेंब अरूच्या हातावर पडले. त्याला वाटलें, तिच्या डोळ्यांतले अश्रूच ते! केविलवाण्या नजरेनें ती अरूकडे पाहूं लागली.

अरूचें हृदय पिळवटून आलें आणि कसें कोण जाणें, पण त्याचे डोळे अश्रूंनीं भरून आले. ती कोकिळा बोलत असल्याचा त्याला भास झाला.

'मूर्खा, काय केलंस रे हें? माझीं पिलं मारून तुला काय मिळालं रे? तुझ्या आईच्या डोळ्यांदेखत तुला कुणीं मारलं तर काय वाटेल रे तिला? मुलांवर आईची किती माया असते हें तुला कसं कळलं नाहीं? मुलं म्हणजे आईच्या काळजाचे तुकडे ते. तूं आज काळीज फोडून टाकलंस माझं ...'

अरूनें लाजेनें मान खालीं घातली. त्याच्या डोळ्यांतून घळघळ अश्रु वाहूं लागले. त्यानें मान वर केली, त्या वेळीं समोरची फांदी मंद हेलकावा घेत होती. त्याला कोकिळा दिसली नाहीं पण कोठून तरी तिचे आर्त स्वर ऐकूं येऊं लागले. 'कुहूऽकुहूऽ.' जणूं ती गात होती.

'बाळें माझीं सोनुलीं कुठें गेलीं?
हाय! दुष्टानें कुस्करून टाकियेलीं! ......'

आतां अरूचा तो दुष्ट छंद पार गेला आहे. कधीं कधीं संध्याकाळच्या वेळीं कोकिळेचे स्वर कानीं आले, कीं तो अस्वस्थ होतो आणि त्याचे डोळे भरून येतात.


Mulgaokar

लाला वयानें कांहीं जास्त नव्हता. नुकतेंच सहावें सरून सातवें वर्ष त्याला लागलें होतें. तो शिकत होता मराठी तिसरी. पण चौथीच्या सुद्धा एकेका मुलाला त्यानें अभ्यासांत हार घ्यायला लावली असती.

होताच तसा तो हुषार. बिगर इयत्तेपासून तों यंदा तिसरीपर्यंत त्यानें आपला पहिला नंबर सोडला नाहीं कधीं. त्याला वर्गांत निळूसारखे प्रतिस्पर्धी पुष्कळ होते. पण लालानें त्यांची डाळ कधींच शिजूं दिली नाहीं आणि निळूला पहिला नंबर कधींच मिळाला नाहीं.

लालाच्या आईबाबांना त्याचें प्रगतिपुस्तक पाहून अभिमान वाटायचा. मास्तरना सुद्धा लालाचें कौतुक वाटायचें.

सरस्वतीपूजन झालें. त्या वेळीं कांहीं रंगीत-संगीत कार्यक्रम झाले. सहामाही परीक्षेचा निकाल लागला. दहाबारा पुस्तकांचा भारा लालाला बक्षीस मिळाला. बक्षिसें घेऊन घरीं आल्यावर त्याच्या आईनें त्याची दृष्ट काढली.

पण त्या दिवसापासून लाला गर्वाच्या पायऱ्या चढूं लागला. आपण कोणी तरी मोठे माणूस आहों, आपल्याकडे कांहीं तरी विशेष आहे असें त्याला वाटूं लागलें. शाळेंतल्या मुलांशीं तो तुसडेपणानें वागूं लागला. घरांत सुद्धा आपल्या लहान भावंडांना तो हिडीसफिडीस करूं लागला. आईवडिलांशीं सुद्धा तो उर्मटपणानें वागूं लागला. त्याच स्वभाव पार बदलून गेला.

अभ्यास वेळचे वेळीं आणि मन लावून करण्याची त्याला सवय होती पण आतां तो आळस करूं लागला.

'हें काय कठीण आहे मला? दोन मिनिटांत करून टाकीन,' तो आपल्याशींच म्हणायचा आणि पुस्तक दूर टाकून द्यायचा. मास्तरांच्या हें लक्षांत यायला वेळ नाहीं लागला. त्यांना वाईट वाटलें. त्यांनीं लालाला सांगून पाहिलें,

"लाला, आतांशा तुझं अभ्यासांत लक्ष दिसत नाहीं!"

पण लाला मनांत म्हणायचा, 'आतांच कशाला पाहिजे करायला? परीक्षेंत पहिला नंबर कांहीं कुणाच्या बापाला मिळायचा नाहीं माझ्याशिवाय ...'

आणि शेवटीं परीक्षा जवळ आली. लाला घाई करूं लागला. पण तो बराच मागें राहिला होता. निळूची मात्र अगदीं जारीनें तयारी चालली होती.

परीक्षा आटोपली आणि एक दिवस निकाल लागला. निळूनें पहिला नंबर पटकावला होता. आपण दुसऱ्या नंबराला आलेले पाहून लालाला फार वाईट वाटलें. खिन्न होऊन तो घरीं आला. दारांतच आई उभी होती. लालाचें उतरलेलें तोंड पाहून तिला सगळें समजलें. त्याला घेऊन ती आंत गेली.

लाला मुकाट्यानें चहा घेत होता. जवळ सुमा आणि पद्रू बसलीं होतीं.

आई गोष्ट सांगूं लागली,

"एकदा काय झालं, एका सुताराच्या घराच्या भिंतीला टेकून एक लांबलचक शिडी उभी होती. त्या शिडीच्या खालच्या अर्ध्या

अधिक पायऱ्या अगदीं मोडकळीला आल्या होत्या नि वरच्या पायऱ्या, त्यांना कुणाचाच पाय लागत नसल्यामुळें चांगल्या टणक होत्या.

"त्यांना एकदा झाला गर्व. त्या खालच्या पायऱ्यांकडे पाहून उपहासानें हसूं लागल्या, त्यांना खिजवूं लागल्या नि तुच्छतेनें म्हणूं लागल्या, 'आमच्या शेजारीं तुम्ही मुळींच शोभत नाहींत. आमचं अंग बघा कसं तुकतुकीत. नाहीं तर तुमचं, शेणमातीनें खरखटलेलं. आम्ही स्वर्गांत तर तुम्ही पाताळांत. आमच्या अंगाला कुणाचेच पाय लागत नसतात कधीं. नाहींतर ...'

"त्याच वेळीं तो सुतार बाहेर आला होता. त्याचें लक्ष सहज त्या शिडीकडे गेलें नि तो म्हणाला, 'छे, ह्या खालच्या पायऱ्या बऱ्याच झिजल्या आहेत. त्या वरच्या मात्र टणक आहेत, तेव्हां आतां ह्या शिडीला उलटी करून ठेवूं या ...'

"नि असें म्हणून त्यानें ती शिडी उलटी करून ठेवली. खालच्या पायऱ्या वर गेल्या नि वरच्या खालीं आल्या."

गोष्ट सांगून झाल्यावर आई हसून म्हणाली,

"ऐकलंस का लाला, गर्वाचं घर नेहमीं खालीं असतं बरं का!"


Mulgaokar

आत्मा जिवाचा प्राण होता. कारण आत्मामुळेंच जिवा जगत होता. आत्मा नसता तर ?

जिवा एक गरीब म्हातारा आंधळा होता. साठीच्या पलीकडे गेला होता तो. साऱ्या जगांत त्याचें मायेचें असें कोणी म्हटल्यास कोणीच नव्हतें. त्याच्या मायेचा शेवटचा धागा दहा वर्षांपूर्वीच तुटला होता. आतां त्याच्यासाठीं रडणारें किंवा ज्याच्यासाठीं त्याच्या डोळ्यांतून टिपें गळलीं असतीं असें एकही माणूस जगाच्या पाठीवर नव्हतें.

जिवा निराधार होता. पोरका होता. गरीब होता, पण...

पंधरा वर्षांपूर्वी तो एक धनाढ्य सावकार होता. गडगंज संपत्ति त्याच्या बंगल्यांत सडत होती. बायको, मुलें, नातवंडें ह्यांनीं बंगला गजबजला होता. पण दुर्दैवाचा तडाखा भयंकर असतो !

एके रात्रीं त्या गांवची जमीन हादरूं लागली. भडका उडाला आणि जिवाजी सावकाराचा बंगला जमीनदोस्त झाला. संपत्ति, संतति गाडली गेली. पण बचावला तो सावकार आणि... अफाट समुद्रांत गटंगळ्या खाणाऱ्या माणसाच्या हाताला होडी लागावी !
... जिवाचा दोन वर्षांचा नातू – आत्मा – बचावला होता.

जिवाचा प्राण झाला तो. त्याला घेऊन एका झोपडींत राहूं लागला जिवा. कष्ट करून दोघांचें पोट भरूं लागला. साखरेच्या खड्याला मुंग्या चिकटतात आणि खडा विरघळला कीं त्या फांकळतात तसेंच झालें जिवाच्या मित्रांचें. त्याच्याजवळ लक्ष्मी होती तोंपर्यंत त्याच्या आजूबाजूला मित्रांचा गराडा पडायचा. पण

पहांटेचा कोंबडा नुकताच आरवला होता. पूर्वेला तांबडें फुटत होतें. गार गार वारा अंगाला झोंबत होता. एका शेताच्या बांधावर, थंडीनें कांकडून गेलेला जिवा कलंडला होता. तो एकसारखा म्हणत होता. "आत्मा ऽ आत्मा ..." इतक्यांत कोठून तरी कुत्र्याचें भुंकणें त्याच्या कानांवर आलें. तो ताडकन् उठून बसला आणि मोठ्यानें ओरडला, "आत्मा ऽ आत्मा ..." शेताच्या पलीकडे एक धिप्पाड कुत्रा उभा होता. त्यानें कान उंचावले होते. त्याचें शेपूट हलत होतें आणि तो धापा टाकीत होता. क्षणार्धांत तो धावत शेताच्या पलीकडे आला. जिवाच्या पसरलेल्या हातांत त्यानें उडी घेतली. जिवानें त्याला घट्ट मिठींत घेतला आणि त्याला तो कुरवाळूं लागला. आत्म्याच्या गळ्यांत जाड साखळीचा एक तुकडा लोंबकळत होता. आत्मा जिवाचें तोंड चाटीत होता. जिवा पुटपुटत होता, "माझा आत्मा ! माझा आत्मा !"


कुळाची
भाऊबीज!

भाऊबीजेचा दिवस होता तो. घरोघर बहिणी भावांना ओवाळण्याची तयारी करीत होत्या. कुंदानें उंची कपडे घातले होते. तिचा मामा धारवाडहून मुद्दाम आला होता. त्यानें कुंदाला पुष्कळ खाऊ आणला होता. तऱ्हतऱ्हेचीं पुस्तकें आणलीं होतीं आणि सुंदर सुंदर पातळें आणलीं होतीं.

कुंदाची आई आज फार आनंदांत होती. ती जरीचें लुगडें नेसली होती. ती आज आपल्या भावाला ओवाळणार होती. स्वयंपाकघरांत आचाऱ्यांची धावपळ चालली होती. तऱ्हतऱ्हेचीं पक्वान्नें तयार होत होतीं. सगळीकडे आनंदी आनंद पसरला होता. पण कुंदा मात्र आज खिन्न होती. कारण तिला भाऊ नव्हता. ती कोणाला ओवाळणार ?

आईनें सुंदर रांगोळी घातली. मध्यें रंगीत पाट मांडला. तबक तयार केलें. शकूनें दिवे पेटविले आणि तिनें भाऊरायाला हाक मारली. कुंदाचा मामा आला, पाटावर बसला. आईनें दिवे लावले आणि भावाला ओवाळलें. भाऊरायानें हातांतलें पुडकें तबकांत ठेवून दिलें. त्यांत एक सुंदर जॉर्जेटचें पातळ आणि पन्नास रुपयांची नोट होती.

कुंदा सारें पाहात होती. तिला वाटलें, 'मला भाऊ असता तर ...! मीही असंच ओवाळलं असतं त्याला. त्यानेंही अशीच ओवाळणी घातली असती मला ...'

ती बाहेर बागेंत आली. झाडावर गुलाबी गुलाब फुलले होते. कुंदानें हळूच एक गुलाब खुडून वेणींत खोवला. इतक्यांत कोठून

तरी मुरलीचे गोड स्वर तिच्या कानीं आले. तिनें पाहिलें. समोरच्या आंब्याच्या झाडावर एका उंच फांदीवर बसून नंदा मुरली वाजवीत होता. कुंदाला त्याची मुरली फार आवडे. पण नेहमीं तिला ती चोरून ऐकावी लागे. कारण नंदा फार लाजाळू होता. वाजव म्हणून सांगितलें तर तो कधींच वाजवीत नसे. कुंदा हळूच आंब्याच्या झाडाखालीं उभी राहून ऐकूं लागली. पण नंदानें तिला पाहिलें. मुरली बंद करून तो खालच्या फांदीवर येऊन बसला.

कुंदा त्याला ओळखत होती. तिच्या बागेंत जो माळी होता त्याचा नंदा हा पुतण्या. गेल्या वर्षींच त्यानें त्याला येथें आणला होता घाटावरून. लोकांचीं गुरें रानांत नेणें हेंच त्याचें काम. कुंदाला कधीं कधीं काजूचे भाजलेले गर आणून द्यायचा तो.

कुंदाला चटकन् आठवण झाली आणि ती नंदाला म्हणाली,

"काय रे हें, तूं इथेंच ? ओवाळून नाहीं घेतलंस ? आज बीज ना रे." नंदा हसला. पण त्याचें तें हसणें विचित्र होतें, कांहीं तरी खुपल्यासारखें होतें. तो हळूच म्हणाला, "कुंदाताई, कोण ओवाळणार हो मला ? मला बहीण नाहीं आहे." थोडा वेळ थांबून तो पुन्हा म्हणाला, "होती मागें. पण गेल्याच्या मागच्या भाऊबीजेच्या दिवशीं तिला साप चावला कुंदाताई. दर बीजेला तिची तीव्रतेनें आठवण होते नि मग असाच कुठें तरी मुरली वाजवीत बसतों मी. ..."

त्याचे डोळे भरून आले. कुंदाला फार वाईट वाटलें.

आपण तसें उगीच विचारलें असें झालें तिला आणि ती चटकन म्हणाली,

"मी ओवाळूं तुला, नंदा?" नंदा भांबावला क्षणभर. डोळे विस्फारून तो म्हणाला,

"छे, छे, ताईसाहेब ..." पण कुंदानें त्याला बोलूंच दिलें नाहीं. त्याचा हात धरून ती त्याला घेऊन घरांत आली. तिनें रांगोळी घातली. पाट मांडला. तबक तयार केलें. आईनें विचारलें, "काय ग हें कुंदा?" आणि कुंदानें आईला सगळें सांगितलें. आई हसली ...

कुंदानें नंदाला आंत नेऊन पाटावर बसवला. तोही अंग चोरून भीत भीत बसला. दिवे लावतांना हळूच मागें वळून कुंदा थट्टेनें म्हणाली, "बरं का नंदा, बहिणीला ओवाळणी घालावी लागते हं भावानें."

नंदा हसला. कुंदाच्या ठिकाणीं त्याला, दोन वर्षांपूर्वीं सर्पदंशानें वारलेली बहीण दिसूं लागली. त्याच्या काळ्याभोर डोळ्यांत पाणी तरळूं लागलें.

कुंदानें त्याला ओवाळलें आणि तबक पुढें केलें. दोन टपोरे अश्रु टचकन् तबकांत पडले. झटपट नंदानें डोळे पुसले आणि तबकांत कांहीं तरी ठेवून दिलें.

ती त्याची मुरली होती! फराळ खाऊन नंदा जाऊं लागला तेव्हां मुरली त्याच्या हातांत देऊन कुंदा म्हणाली, "नंदा, ही घे, तुझी मुरली. फक्त वाजवून दाखव मला."

अनुक्रम 2-९-६-८१

नंदानें मुरलीवर सुंदर सुंदर गाणीं वाजवून दाखवलीं.

जातांना कुंदानें त्याच्या हातांत कागदांत गुंडाळून कायसें दिलें आणि ती म्हणाली, "ही घर बहिणीची भेट म्हणून. घरीं गेल्याशिवाय उघडूं नकोस हं ?"

घराच्या दारांतच नंदानें ती उघडून पाहिली. आंत एक दहा रुपयांची नोट होती.


काळा फत्तर!
Mulgaokar

• मुकुंदाच्या चेहेऱ्याकडे पाहिलें, कीं कोणालाही त्याचा तिटकारा आला असता. कोणीही नाक मुरडावें असेंच त्याचें रूप होतें. वास्तविक रूपाचा आणि स्वभावाचा परस्पर संबंध किती आहे कोणाला ठाऊक, पण अगदीं पहिल्याच दिवशीं मुकुंद आमच्या वर्गांत आला, त्या दिवसापासून त्याच्याविषयीं आम्हाला कांहींच कुतुहल वाटलें नाहीं, उलट तिरस्कारच आला. त्याचा तो काळाभिन्न रंग अगदीं अमावास्येच्या रात्रीलाही लाजविणारा होता. त्याचे ते बटबटणारे मोठाले डोळे, सोड्याच्या बाटलींतल्या गोट्याच जणूं! तोंडावर देवीचे खोल व्रण, फेंदरें नाक आणि सगळ्यांवर कळस म्हणूनच कीं काय, जाड्या ओठांची फळी फोडून बाहेर घुसलेले ते दांत. मला तरी तें ध्यान पाहाण्याबरोबर हसूं आलें आणि नंतर वर्गांतलीं सगळींच मुलें फिदी फिदी हसूं लागलीं.

आपल्या शेजारीं त्याला जागा देण्यास कोणीच राजी झाला नाहीं. शेवटीं तो माझ्याजवळ येऊन म्हणाला, "मी बसूं का इथें?" त्याचा आवाज कड्यावरून घसरून पडणाऱ्या दगडासारखा वाटला मला.

"ही जागा माणसांसाठीं आहे, फत्तरासाठीं नव्हे!" मी खोंचून बोललों. वर्गांत मोठा हशा पिकला. तो मुकाट्यानें शेवटच्या एका रिकाम्या बाकावर जाऊन बसला. त्या दिवसापासून त्याला आम्ही टोपण नांव ठेवलें, 'काळा फत्तर!'

आम्हां विद्यार्थ्यांनाच केवळ नव्हे, तर मास्तरांना सुद्धा त्याच्याविषयीं सहानुभूति वाटली नाहीं कधीं.

एक दिवस इतिहासाच्या मास्तरांनीं विनोद केला,

" काय रे मुकुंद, लहानपणीं तुझी आई तुला कोळशाच्या पाण्याची आंघोळ घालीत असे कीं काय ? " त्यावर एकदम त्यानें उत्तर दिलें,

" माझ्या अकराव्या दिवशींच आई सोडून गेली मला, सर ! "

मुलांनीं हसण्यासाठीं उघडलेलें तोंड एकदम बंद केलें. आपला विनोद फुकट जाऊं द्यावयाचा नाहीं असा मास्तरांनीं पण केला होता कीं काय कोणास ठाऊक. ते पुढें म्हणाले, " मग चहाला असशील लहानपणांत ..."

" असेल ! गरिबांना दूध, चहा कुठून मिळणार ? त्यांनीं कोळशाचें पाणी सुद्धा ..." त्याच्या बटबटीत डोळ्यांत कसली तरी चकाकी दिसूं लागली.

एक दिवस मास्तर सहज हसत त्याला म्हणाले,

" मुकुंद, ह्या पांढऱ्या सदऱ्यांत तुझा काळा रंग जास्तच भयंकर दिसतो बघ. उद्यांपासून हा पांढरा सदरा घालून येऊं नकोस."

वर्गांतलीं मुलें खदखदा हसूं लागलीं. मुकुंद मास्तरांकडे पाहातच राहिला. त्याच्या मोठाल्या डोळ्यांत पाणी सांचूं लागलें. त्याचे जाड ओठ थरथरूं लागले.

" शाळेंत येऊं नका म्हणून सांगा, सर ! पण ह्या पूज्य कपड्यांना टाकून द्यायला नका सांगूं."

स्वातंत्र्यदिनाचा आदला दिवस. मधल्या सुटींत आम्ही टीचर्स-रूम बाहेर बोलत उभे होतों. तोंच आंतून मुकुंदाचा आवाज ऐकूं आला. मी एकदम ओरडलों, "ऐका, ऐका. काळा फत्तर बोलतो आहे." आम्ही कान देऊन ऐकूं लागलों, मुकुंद हेडमास्तरांशीं बोलत होता,

"पण सर, आमच्या स्वातंत्र्यासाठीं आम्ही कांहींच करूं नये काय?"

"तें तुमचं कर्तव्य नाहीं. शिक्षण हेंच तुमचं आजचं कर्तव्य आहे. तुम्ही मॅट्रिकचीं मुलं आहांत. लहान नाहीं कांहीं. विचार करण्याची शक्ति असली पाह्यजे तुम्हांला ..."

"क्षमा करा सर, पण विचार करण्याची शक्ति आहे म्हणूनच तर मला वाटतं, कीं नुसतं पुस्तकी शिक्षण हेंच कांहीं, निदान आमचं तरी कर्तव्य खास नाहीं. परतंत्र हिंदुस्थानचे विद्यार्थी आहोंत आम्हीं. उद्यांच्या स्वातंत्र्यदिनाला सहानुभूति म्हणून तरी स्कूल बंद ठेवण्याची नोटीस दिली पाह्यजे आपण ..."

"तें शक्य नाहीं!" हेडमास्तर तारस्वरांत गरजले.

"मग आम्ही हरताळ पाडूं!" मुकुंद झपाट्यानें बाहेर आला. आम्ही आश्चर्यानें त्याच्याकडे पाहूं लागलों.

स्वातंत्र्यदिन उजाडला. गांवांत पुष्कळ दुकानें बंद होतीं. तिरंगी झेंडे घेऊन मुलें रस्त्यांत फिरतांना दिसत होतीं.

मी शाळेंत गेलों. पण तो प्रकार पाहून चकितच झालों. शाळेच्या आवारांत मुलांची गर्दी झाली होती. मुलें दरवाजा अडवून उभीं होतीं आणि मुकुंद आवेशानें बोलत होता,

"नाहीं, तुम्हांला आंत जायला मिळणार नाहीं. आज स्वातंत्र्यदिन आहे. आज आपण हरताळ पाडला पाह्यजे. स्वातंत्र्याकरितां प्राण अर्पण करण्याची आपण प्रतिज्ञा केली पाह्यजे. आमचे मोठमोठे पुढारी आज तुरुंगांत खितपत पडले आहेत. आम्हांला लाज वाटली पाह्यजे त्याची. निदान त्यांच्या पूज्य स्मृतीसाठीं तरी आपण आजचा हरताळ यशस्वी ... ..."

पों ऽ पों मोटारचा हॉर्न वाजला. हेडमास्तर आल्याचा इशाराच तो!

समोरील दृश्य पाहून हेडमास्तर चवताळलेल्या वाघाप्रमाणे धावत गेले.

"मुकुंद, काय आरंभलं आहेस तूं हें?"

"कर्तव्य!" शांतपणानें मुकुंद उत्तरला.

"बाजूला सर." हेडमास्तर मोठ्यानें गरजले.

"शक्य नाहीं." हेडमास्तरांना मुकुंदनें उलट उत्तर दिलेलें पाहून कांहीं बंडखोर मुलें खवळलीं. हेडमास्तरांची सहानुभूति त्यासाठीं कांहीं बंडखोर ओरडले,

"बाजूला हो मुकुंद. आंत जायचंय् आम्हाला! ..."

"लाथाडून जा आम्हांला!" मुकुंद आणि कांहीं मुलें मोठ्यानें गालीं आणि इतक्यांत कोठूनतरी एक दगड सणसणत आला.

मुकुंदच्या डोक्यांतून रक्ताची धार सळकन उडाली.

" वंदे मातरम् ..." पडतां पडतां मुकुंद ओरडला.

आणि लाजेनें मी अर्धमेला झालों. काळा फत्तर म्हणून मीं मुकुंदला आजपर्यंत हिणविलें. पण मीच आतां फत्तर बनलों होतों. नकळत माझे पाय पुढें धावले. मुकुंदला उचलून धरून मी मोठ्यानें ओरडलों,

" जा, मित्रांनो मागें फिरा. आतां तरी हा हरताळ यशस्वी करून दाखवा. स्वातंत्र्यदिनाच्या ह्या मंगल दिवशीं एका देशभक्ताचं रक्त तुम्हाला विनवीत आहे. भारतमातेला विसरूं नका. बोला, वंदे मातरम् ..."

सारे विद्यार्थी नकळत ओरडले,

" वंदे मातरम् ... वंदे मातरम् ..."

आणि ह्या आवाजांत दूर निघून जाणाऱ्या हेडमास्तरांच्या मोटारचा आवाज विरून गेला.

अनुक्रम २९८८९
विभाग का.वा.
क्रमांक ७९५१
नों. दि. ३-७-६१